महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
**महावितरण**
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र.मासं/मावक /न.क्र.३७/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
**मुंबई ४०० - ०१९**
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

## प्रशासकीय परिपत्रक क्र.५२२ दिनांक ०५ / ११ / २०१५

**विषय :** आरक्षणाची पदे पदोन्नतीने भरण्या संदर्भातील व बिंदु नामावली नोंदवही ठेवण्याबाबतची विहित कार्यपध्दती.

**संदर्भ :** १) प्रशासकीय परिपत्रक क्र. ४४३ दिनांक ०३/०१/२००५.
२) शासन निर्णय क्र. बीसीसी २००१/ १८८७/ प्र.क्र.६४/०१/१६- ब दिनांक २६/१०/२००४.
३) सामान्य प्रशासन विभाग पत्र क्र.- बीसीसी-२०१५/प्र.क्र.३९२A/ १६- ब, दि. ३१/१०/२०१५.

......

विविध प्रवर्गातील पदे पदोन्नतीने भरतांना आरक्षणासंदर्भात अनुसरावयाची कार्यपध्दती व बिंदुनामावली नोंदवही ठेवण्याबाबत पूर्वीच्या म.रा.वि..मंडळ व तद्नंतर अस्तित्वात आलेल्या कंपनीमध्ये वेळोवेळी मार्गदर्शक सूचना पारीत करण्यात आलेल्या आहेत.

२ संदर्भिय शासन निर्णयांच्या अनुषंगाने आरक्षणाची पदे पदोन्नतीने भरताना तसेच बिंदुनामावली नोंदवही ठेवण्याबाबतच्या तरतुदीची योग्य रित्या अंमलबजावणी व्हावी व त्यामध्ये एकसूत्रता असावी या दृष्टीकोनातून शासनाकडून पत्र क्र. बीसीसी-२०१५/प्र.क्र.३९२A/ १६- ब, दि. ३१/१०/२०१५ अन्वये मार्गदर्शन प्राप्त झाले आहे. सदरच्या पत्राची प्रत यासोबत संलग्न केली आहे.

३. मा. व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (प्रकल्प) व संचालक (संचलन) यांच्याशी विचार विनिमय करुन खालील मार्गदर्शक सूचना पारीत करण्याकरिता मंजूरी प्रदान केली आहे.

क) मागासवर्गीय कर्मचा-यांस खुल्या प्रवर्गातून पदोन्नती दिल्यानंतर त्याच्या मागास प्रवर्गाचे पद रिक्त झाल्यास त्या कर्मचा-यांस त्याच्या स्वतःच्या प्रवर्गातील रिक्त पदावर समायोजित करुन रिक्त होणारे पद खुल्या प्रवर्गातून भरणे आवश्यक राहील.

ख) सरळसेवेच्या बाबतीत गुणवत्तेवर खुल्या प्रवर्गातून नियुक्त झालेल्या उमेदवारास खुल्या बिंदुवर दर्शवावे व त्याचे समायोजन करण्याचा प्रश्न उद्भवत नाही, परंतु पदोन्नतीच्या बाबतीत वर प्रस्तावित केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

ग) सबब, सर्व संबंधित सक्षम प्राधिकारी व नियुक्ती प्राधिकारी यांनी सदरच्या सूचना आपले अखत्यारितील सर्व अधिकारी/ कर्मचारी यांचे निदर्शनास आणून द्याव्यात व त्यांचे काटेकोरपणे पालन होईल याबाबतची खबरदारी घ्यावी.

४. उपरोक्त मार्गदर्शक सूचना दिनांक १ ऑक्टोबर, २०१५ व त्यानंतर विविध प्रवर्गातील पदे पदोन्नतीने भरताना लागू कराव्यात व यापुर्वी निकाली काढण्यात आलेल्या पदोन्नतींच्या प्रकरणांचा पुनर्विचार करण्याची आवश्यकता नाही. सदर सूचनेप्रमाणे आरक्षण स्थिती दर्शवणारी बिंदू नामावली संबंधित सक्षम अधिकारी (राज्य शासनाचा सामान्य प्रशासन विभाग- कक्ष १६-ब अथवा विभागीय आयुक्त कार्यालयातील मागासवर्गीय कक्ष) यांचेकडून तपासून घ्यावी.

५. सर्व संबंधित सक्षम प्राधिकारी व नियुक्ती अधिकारी यांनी उपरोक्त मार्गदर्शक सूचनांचे अवलोकन करुन आपल्या अखत्यारितील कार्यालयांतर्गत आरक्षणांची पदे पदोन्नतीने भरताना सदर सूचनांचा अवलंब करुन त्या अनुषंगाने कार्यवाही करावी.

६. सदरचे प्रशासकीय परिपत्रक हे कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

सोबत :- वरील प्रमाणे.

**(नीलेश गटणे)**
**कार्यकारी संचालक (मासं)**

महाराष्ट्र शासन
दूरध्वनी क्र. (०२२)२२७९३३५५
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
** डिजिटाईज्ड कालबध्द सेवा वर्ष- २०१५ ***

---

क्र. बीसीसी-२०१५/प्र.क्र. ३९२ A/१६ -ब,                    दिनांक :३१ ऑक्टोबर, २०१५

प्रति,

कार्यकारी संचालक,(मासं)
महाराष्ट्र राज्य वितरण कंपनी
प्रकाशगड, ४ था मजला,प्लॅाट नं. जी-९,
प्रो. अनंत कानेकर मार्ग,
बांद्रा (पूर्व) मुंबई ४०० ०५१

विषय : आरक्षणाची पदे पदोन्नताने भरण्यासंदर्भातील विहीत कार्यपध्दती.
संदर्भ : आपले पत्र क्र. कासं(मासं)/मावक/३५४३०, दिनांक ३० सप्टेंबर,२०१५

महोदया ,

उपरोक्त पत्रास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२६.१०.२००४ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार एखादया मागासवर्गीय कर्मचाऱ्यास त्याच्या स्वत:च्या प्रवर्गाचे पद रिक्त नाही म्हणून सेवाजेष्ठता आणि पात्रतेच्या आधारे त्या कर्मचाऱ्यास खुल्या प्रवर्गातून पदोन्नती देता येते.

मॅटमधील मूळ अर्ज क्रमांक १४७/२०१० यामध्ये तात्कालीन मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञा पत्रात नमूद केलेली वस्तुस्थिती /कार्यपध्दती ही सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२६.१०.२००४ च्या शासन निर्णयानुसारच विहित केलेली आहे. तसेच सदर कार्यपध्दती ही. मा. सर्वोच्च न्यायालयाने आर.के.सबरवाल विरुध्द पंजाब या प्रकरणी विहित केलेली आहे.(सुलभ संदर्भाकरिता मुळ अर्ज १४७/१० च्या प्रतीज्ञापत्राची प्रत सोबत जोडण्यात येत आहे.)

त्यानुसार मागासवर्गीय कर्मचाऱ्यांस खुल्या प्रवर्गातून पदोन्नती दिल्यानंतर त्याच्या मागास प्रवर्गाचे पद रिक्त झाल्यास त्या कर्मचाऱ्यांस त्याच्या स्वत:च्या प्रवर्गातील रिक्त पदावर समायोजित करुन रिक्त होणारे पद खुल्या प्रवर्गातून भरणे आवश्यक राहील.

सरळसेवेच्या बाबतीत गुणवत्तेवर खुल्या प्रवर्गातून नियुक्त झालेल्या उमेदवारास खुल्या बिंदुवर दर्शवावे व त्याचे समायोजन करण्याचा प्रश्न उद्भवत नाही परंतु पदोन्नतीच्या बाबतीत वर प्रस्तावित केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

आपला

( सं. कृ. भोसले )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन